**तदर्थ जिल्हा न्यायाधीश–१ व सहायक सत्र न्यायाधीश यांचे न्यायालय,यवतमाळ**

**सत्र खटला क्र. ८८/२०२४**
**निशाणी क्र. २०**

**महाराष्ट्र शासन तर्फे पो.स्टे. यवतमाळ ग्रामीण** **सरकारी अभियोक्ता**
**..वि..**
किशोर लक्ष्मण इंगळे + ३ **आरोपी.**

| | |
|---|---|
| शासन तर्फे साक्षीदार क्र. ४ | |
| मी याद्वारे शपथपूर्वक सांगतो की – | |
| माझे संपूर्ण नाव | संजय अंबादास गिरी |
| वय अंदाजे ४७ वर्षे | धंदा– नौकरी, ग्राम पंचायत कार्यालय, किन्ही |
| राहणार | किन्ही, ता. जि. यवतमाळ. |
| **सरतपासणी श्री. एन. एन. पांडे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचेमार्फत शपथेवर सुरुः–** | |

सन २०२३ मध्ये मी ग्राम पंचायत किन्ही येथे लिपिक या पदावर कार्यरत होतो. दिनांक १/११/२०२३ रोजी मला पोलीस स्टेशन येथे पंच म्हणून हजर राहाण्यास बोलविले होते. त्यानूसार मी पोलीस स्टेशनला गेलो होतो. पोलीस स्टेशनला मला पंचनामा दाखविण्यात आला व त्यावर स्वाक्षरी करण्यास पोलीसांनी सांगीतले. पंचनामा मला वाचून दाखविण्यात आला नाही व मी न वाचताच त्यावर स्वाक्षरी केली. आता घटनास्थळ पंचनामा मला दाखवला, त्यावर माझी सही असून **तो निशाणी क्रमांक २१ वर आहे**. मात्र, मला पंचनाम्यातील मजकूर माहिती नाही.

**साक्षीदार त्यांच्या बयानाप्रमाणे पुरावा देत नसल्यामुळे त्याची उलटतपासणी घेण्याची परवानगी सरकारी वकिलांनी मागीतली. त्यानूसार परवानगी देण्यात आली.**

**उलटतपासणी सरकारतर्फे श्री. एन.एन.पांडे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचेमार्फत सुरुः–**

२. हे म्हणणे खरे नाही की फिर्यादी संदिप मेहत्रे, दुसरा पंच व मी सरकारी वाहनाने मौजा किन्ही येथे घटनास्थळावर घटनास्थळ पंचनामा तयार करण्याकरीता गेलो व ते घटनास्थळ संदिप मेहत्रे यांनी दाखविले व ते घटनास्थळ डॉ. सतिश लचके यांच्या

शेतामधील होते. हे म्हणणे खरे नाही की पोलीसांनी माझ्यासमोर तो घटनास्थळ पंचनामा तयार केला व त्यावर मी वाचून समजून सही केली. मी इयत्ता दहावी उर्तीर्ण आहे. हे म्हणणे खरे आहे की कोणत्याही दस्तऐवजावर मी वाचून समजून सही करतो. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपींना वाचविण्याकरीता खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे आहे की आरोपी अशोक पुरी हा माझ्या गावात राहतो. हे म्हणणे खरे नाही की माझे आरोपी अशोकसोबत चांगले संबंध आहे. हे म्हणणे खरे नाही की आरोपी अशोक हा माझ्या गावात राहत असल्यामुळे त्याला वाचविण्याकरीता मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की मी खोटे सांगत आहे की मी पंचनाम्यावर पोलीस स्टेशनमध्ये सही केली.

**उलट तपासणी आरोपीचे वकील श्री. पि.पि.किर्दक यांचे मार्फत सुरु –**

३. उलटतपास नाकारला.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

(पी.एस.इंगळे)

दिनांक – ०३/०१/२०२६ अतिरिक्त सत्र न्यायाधीश, यवतमाळ.